प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 2266 0358

वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

मार्च ११, २०११

**“बृहदीश्वरार मंदिराची एक हजार वर्षे”**
**ह्या विषयाबाबत रु. ५ ची नवी नाणी देणे.**

बृहदीश्वरार मंदिराची एक हजार वर्षे ह्या विषयावरील रु. ५ ची नाणी भारतीय रिझर्व बँक लवकरच वितरित करत आहे. वरील मूल्याच्या नाण्यांचे आकार, डिझाईन व धातुमिश्रण पुढीलप्रमाणे असेल.

| नाण्याचे मूल्य | आकार व बाह्य व्यास | खाचांची संख्या | धातुमिश्रण |
|---|---|---|---|
| पाच रुपये | वर्तुळाकार<br>२३ मि.मी. | १०० | निकेल ब्रास<br>तांबे - ७५%,<br>जस्त २०%,<br>निकेल ५%. |

**दर्शनी बाजू** : ह्या भागावर, मध्यभागी अशोक स्तंभावरील सिंह प्रतिमा व त्याखाली ‘सत्यमेव जयते’ लिहिले असेल. वरच्या कडेस डाव्या बाजूला हिंदीमध्ये ‘भारत’ व उजव्या बाजूस इंग्रजीत INDIA हे शब्द असतील. सिंह प्रतिमेच्या खाली आंतरराष्ट्रीय अंकात “५” हा मूल्यदर्शक अंक असेल व त्याच्या डाव्या बाजूस हिंदीमध्ये “रुपये” आणि उजव्या बाजूस इंग्रजीमध्ये RUPEES हे शब्द असतील.

**मागील बाजू** : ह्या बाजूवर बृहदीश्वरार मंदिराचे चित्र व चोला राजवंशातील किंग राजा राजन १ ह्याचे हात जोडलेले चित्र असेल व त्याच्या डाव्या बाजूस “बृहदीश्वरार मंदिर के १००० वर्ष” हे शब्द हिंदीत तर उजव्या बाजूस “1000 YEARS OF BRIHADEESWARAR TEMPLE"

हे शब्द इंग्रजीत दिले असतील आणि चित्राच्या खाली डावीकडे हिंदीमध्ये “तंजावुर” व उजवीकडे इंग्रजीत “THANJAVUR" हे शब्द असतील. चित्राच्या खाली “२०१०” हे वर्ष आंतरराष्ट्रीय अंकात दिले असेल.

कॉईनेज अधिनियम, १९०६ मध्ये निर्देशित केल्यानुसार ही नाणी वैध असे चलन आहेत. रु. ५ ची विद्यमान असलेली नाणी, वैद्य चलन असणे सुरुच राहील.

**अजित प्रसाद**
सहाय्यक महाव्यवस्थापक

**वृत्तपत्रांसाठी निवेदन : २०१०-२०११/१२९८**